An AIChE Technology Alliance
CCPS Center for Chemical Process Safety
www.aiche.org/ccps

Process Safety Beacon
http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx
उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

या आवृत्तीचे प्रायोजक
ioMosaic
www.iomosaic.com

# कार्यपरवाना – कामाची व्याप्ती समजावून घ्या

**जून २०१८**




एक कंत्राटी देखभाल कामगार एका तेल रिफायनरीमधील एका टाकीवरील पाइपचा एक भाग बसविण्याची तयारी करीत होता (१,२). या कामासाठी कार्यपरवाना देण्यात आला होता ज्यात टाकीच्या बंदिस्त जागेमध्ये प्रवेश करणे आवश्यक धरले नव्हते. कामाची व्याप्ती पाइपचा एक भाग बसविण्यापुरती मर्यादित होती. कार्यपरवान्यामधील "नायट्रोजन पर्ज किंवा इनर्ट" च्या समोरील रकान्यात लागू नाही असे दर्शविण्यात आले होते तथापि ती टाकी नायट्रोजनने पर्ज करण्यात येत हाती (४).

टाकीच्या आंत एक टेपची गुंडाळी (५) राहून गेली असल्याचे कामगारांच्या निर्दशनास आले व त्यांनी ती पाइप बसविण्यापूर्वी काढून टाकण्याचे ठरविले (६). लांब तारेच्या साह्याने ती टेप काढणे त्यांना शक्य झाले नाही. त्यावेळी टेप काढण्यासाठी एका कामगाराने टेपच्या जवळ जाण्याचा प्रयत्न केला व त्या प्रयत्नात तो टाकीच्या तोंडाजवळील ऑक्सिजनविहीन वातावरणाच्या संपर्कात आल्यामुळे टाकीत पडला. अशी पण शक्यता आहे की टेप घेऊन पटकन परत येऊ अशा विचाराने तो टाकीच्या आंत उतरला असावा. तो कामगार टाकीत पडला, आणि, घटना अधिक विदारक करण्यासाठी म्हणा, त्याचा सहकामगार त्याला सोडविण्यासाठी टाकीच्या आंत उतरला आणि जवळपास शुध्द नायट्रोजनच्या वातावरणांत पडला. दोन्ही कामगार नायट्रोजनमुळे गुदमरून मेले.

ही घटना जून २०१२ च्या बीकॉनमध्ये आपण नायट्रोजनचे धोके या शीर्षकामध्ये चर्चिली होती आणि एप्रिल २०१५ च्या बीकॉनमध्ये आपण कार्यपरवाना पध्दतीचे महत्व चर्चिले होते. पण यामध्ये अजून एक शिकवण आहे – कोणतेही काम करीत असताना त्या कामाच्या व्याप्तीमध्ये होणारे बदल ज्यासाठी कार्यपरवाना आवश्यक असतो असे बदल ओळखणे आवश्यक असते. बदलामुळे अधिक धोके उद्भवू शकतात ज्यास अतिरिक्त सुरक्षा उपाय आवश्यक असतात.

## आपणास हे माहीत आहे काय?

- कार्यपरवान्यामध्ये देखभालीच्या गटास नायट्रोजन पर्जिंगविषयी कोणतीच चेतावणी मिळाली नाही.
- ज्याक्षणी देखभालीच्या कामगारांनी टाकीमध्ये उतरून टेपची गुंडाळी काढण्याचा निर्णय घेतला त्याचवेळी कामाची व्याप्ती बदलली. मुळ कार्यपरवान्यामध्ये टाकीमध्ये उतरून एखादी वस्तू काढण्याची गरज पडेल असे गृहीत धरले नव्हते. टेप काढण्यासाठी संभाव्य बंदिस्त जागेत प्रवेश करावा लागेल असे गृहीत धरून नवीन कार्यपरवाना घेणे आवश्यक होते.
- या घटनेमध्ये फक्त टेप काढण्यासाठी टाकीत उतरण्यासाठी देखील बंदिस्त जागेत प्रवेश करण्याचा परवाना आवश्यक होता. जेव्हा एखाद्या माणसाचा कोणताही अवयव, एक माणूस पूर्णपणे आंत उतरण्यास पुरेशा अशा मुखाची पातळी ओलांडणार असेल तेव्हा बंदिस्त जागेत प्रवेश करण्याचा परवाना आवश्यक असतो. ही यूएस ओएसएचए व अन्य अधिकाऱ्यांची मार्गदर्शिका आहे.

## आपण काय करू शकता?

- जर तुम्ही कार्यपरवाना देत असाल तर खात्री करा की,
  - संभाव्य धोके ओळखून काम करणाऱ्या संबंधिताना त्यांची माहिति दिलेली आहे.
  - आवश्यक सुरक्षा कार्यपध्दती नमूद केल्या आहेत व समजल्या आहेत,
  - वैयक्तिक सुरक्षा साधने उपलब्ध आहेत व ती वापरल्या जात आहेत.
  - काम करणारी माणसे कामाची व्याप्ती व्यवस्थितपणे जाणतात तसेच कामाच्या **मूळ व्याप्तिमध्ये समाविष्ट नसलेले कोणतेही काम करण्यापूर्वी काम थांबवून तुमच्याशी संपर्क** करण्याचेही जाणतात.
- कार्यपरवाना आवश्यक असणारे काम तुम्ही करीत असाल तर:
  - कामाशी निगडीत धोके, सुरक्षा पध्दती व वैयक्तिक सुरक्षा साधने समजून घ्या.
  - कामाची व्याप्ती समजून घ्या.
  - जेव्हा तुम्ही काम करीत असता तेव्हा कामाच्या प्रत्येक टप्प्यावर काही बदलाची तुम्ही नोंद घेता. ***मूळ व्याप्तिमध्ये समाविष्ट नसलेले कोणतेही काम करण्यापूर्वी काम थांबवून ज्या व्यक्तिने तुम्हास कार्यपरवाना दिला त्यांच्याशी संपर्क करा!***
  - जर कामाची व्याप्ति बदलली असल्याची खात्री नसेल तर थांबा आणि ज्या व्यक्तिने तुम्हास कार्यपरवाना दिला त्यांच्याशी संपर्क करा

## परवानायुक्त कामाच्या व्याप्तिमधील बदल ओळखा!

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणासही पुनर्विक्रीसाठी वापर करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org किंवा 646&495&1371

हे बीकॉन सहसा अरेबिक, अफ्रीकन, कॅटॅलॅन, चिनी, झेक, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मालय, मराठी, पर्शियन (फारसी), पोलीश, पोर्तुगीज, रोमानियन, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तेलगू, थाई, तुर्की, आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. Shirish Gulawani, Maharashtra, India.